# एक डीपी – एक शेतकरी योजना

धनश्री निगडे
आचार्य पदवी विद्यार्थिनी
विस्तार शिक्षण विभाग
वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी



भारतामध्ये गहू व तांदूळ या पिकांमध्ये हरित क्रांती झाली. या हरित क्रांती होण्यामागे अनेक करणे सांगितली जातात. सुधारित व संकरीत बियाणे, खाते व किताकानाशाके आणि पिक उत्पादनाच्या नव्या तंत्रज्ञानाचा अवलंब. तसेच एक आणखी महत्वाचे कारण म्हणजे जलसिंचन. सिंचनाची सोय केल्यामुळे हरितक्रांतीला बऱ्याच प्रमाणात पाठबळ मिळाले, किंबहुना जे पिक आपल्याकडे घेणे शक्य नव्हते तेही आपण इथे अधिक उत्पादित करू लागलो. जलसिंचनाच्या सोयीमुळे ग्रामीण भारत अधिक बळकट व्हायला सुरुवात झाली. पारंपारिक पद्धतीने केली जाणारी शेती आधुनिक व औद्योगिक होऊ लागली. नंतर पुढे विद्युत मोटारी आणि पंपसेट आले. पाण्याचा उपसा होऊ लागला. पुढे उपसा सिंचनाला खूप महत्व आले. विद्युत मोटारीमुळे थोड्याच वेळात जमिनीची पाण्यासाठी असणारी भूक भागू लागली. नंतरच्या काळात जणू जमिनीतील पाणी उपसण्याची स्पर्धाच चालू झाली.

शेतीमध्ये विद्युत उपकरणांचा वाढता वापर हा वीजटंचाईला आमंत्रण देऊ लागला. यामध्ये लोडशेडिंग या शेतकऱ्यांच्या मनावर आणि काळजावर राज्य करणारा शब्द तयार झाला. विजेची वाढती मागणी हि सरकारसाठी मोठी डोकेदुखी बनू लागली. औद्योगिक वसाहतींना वीज पुरवठा करण्यात शेतीला अपुरी वीज देणे सरकारला सोयीस्कर वाटू लागले. त्यामुळे शेतीला रात्री आणि दिवसा अशा विजेच्या पाळ्या चालू झाल्या. विहिरींची वाढती संख्या, तुकड्यात वितरीत होणारी शेती आणि प्रत्येक विहिरीवर स्वतंत्र मीटर यामुळे विजेवर ताण येऊन तांत्रिक बिघाड हे ऐन हंगामात होऊ लागले. त्यामुळे स्वतंत्र डीपीची मागणी शेतकऱ्यांकडून जोर धरू लागली. यामुळे या लेखात "एक डीपी - एक शेतकरी" या महाराष्ट्र शासनाच्या योजनेविषयी आपण जाणून घेणार आहोत. महाराष्ट्र किसान ट्रान्सफॉर्मर स्कीम म्हणजे काय आणि शेतकरी ट्रान्सफॉर्मर स्कीम महाराष्ट्र कसा घेऊ शकतो हे जाणून घेऊ.

ऊर्जा विभागाची उच्चदाब वितरण प्रणाली योजना पूर्ण राज्यात राबविणेसाठी प्रतिपुर्ती स्वरुपात राज्य शासनामार्फत एशियन डेव्हलपमेंट बँककडून रुपये २,२४८ कोटी (३४६ दशलक्ष युएस डॉलर) इतके कर्ज घेण्यास मान्यता देण्यात येत आहे. त्या अनुषंगाने एशियन डेव्हलपमेंट बँकेसोबत विहित नमुन्यात केंद्र शासन / राज्य शासन व महावितरण कंपनीस अनुषंगिक करार करण्यास मान्यता देण्यात येत आहे. महाराष्ट्र किसान ट्रान्सफॉर्मर योजना महाराष्ट्र अंतर्गत एक शेतकरी एक ट्रान्सफॉर्मर योजना, उच्च व्होल्टेज वितरण लाइनसाठी वीज जोडणी प्रदान करणार. प्रत्येक शेतकऱ्यांना एक ट्रान्सफॉर्मर उपलब्ध करुन दिले जाईल. या योजनेतून राज्यातील दोन लाख शेतकऱ्यांना अखंडित वीजपुरवठा होईल अशी अपेक्षा आहे.

राज्यात काही ठिकाणी वीजपुरवठा ७० टक्क्यांपर्यंत कमी आहे, ज्याला सरकारला १५ टक्के लक्ष्य घ्यायचे आहे. एवढेच नव्हे तर वीज समस्येवर मात करण्याचेही सांगितले आहे तसेच राज्यातील सुमारे दोन लाख शेतकऱ्यांना हाय व्होल्टेज वितरण लाईनसाठी वीज कनेक्शन दिले जाईल जे अखंडित वीजपुरवठा सुनिश्चित करेल. शेतकऱ्यांना कायमस्वरूपी कनेक्शन मिळावे म्हणून शासनाने कृषी संकल्प योजना सुरू केली. यामध्ये सामान्य वर्गातील शेतकऱ्यांला ७ हजार रुपये खर्च करावा लागणार असून अनुसूचित जाती व जमातीतील शेतकऱ्यांना वैयक्तिक ट्रान्सफॉर्मर्स बसविण्यासाठी प्रति अश्वशक्ती ५००० रुपये खर्च करावे लागणार आहेत. ट्रान्सफॉर्मरचा उर्वरित खर्च सरकार उचलणार आहे. दोन हेक्टरपेक्षा कमी जमीन असलेल्या सामान्य वर्गातील शेतकऱ्याला वीज दिल्यानंतर त्याच्या शेतात एक ट्रान्सफॉर्मर प्रति हॉर्सपावर ७ हजार रुपये आणि एससी एसटी वर्ग शेतकऱ्यांस ५००० रुपये तसेच ५ हेक्टरपेक्षा जास्त जमीन असलेल्या शेतकऱ्यांना ११ हजार द्यावे लागतील. उर्वरित रक्कम कंपनीला अनुदान म्हणून सरकार देईल. योजनेंतर्गत दोन हेक्टरपेक्षा कमी जमीन असलेल्या सामान्य वर्गाच्या शेतकऱ्यांला ३ एचपी कायमचा कनेक्शन मिळाल्यास त्याला प्रति अश्वशक्ती ७ हजार रुपये दराने २१ हजार, एससीएसटी वर्गाला १५ हजार.

शेतकऱ्यांना कायमस्वरुपी कनेक्शन मिळण्यासाठी खसरा-खतौनी, बँक खाते, आधार कार्डची कॉपी अनिवार्य आहे. अधिक माहितीसाठी आपल्या जवळच्या वीज जोडणी कार्यालयाला भेट द्या अथवा कार्यकारी अभियंता (महावितरण) यांच्या कार्यालयाशी संपर्क साधावा.

(संपर्क: +९१ ९९७५२९५८००)

★ ★ ★